महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● रायगड ● पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक – रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

सोमवार ❖ २० जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - २०६ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच?

### २२ जानेवारीच्या सुनावणीवर भवितव्य

सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारी रोजी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. प्रामुख्याने महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने, याबाबतचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात झाल्यानंतर निवडणुकीची तयारी करण्यासाठी किमान तीन महिन्यांचा वेळ लागेल.

> मार्च-एप्रिलमध्ये बिगुल वाजणार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एप्रिल-मे महिन्यात होतील, असे मानले जात आहे. भाजपच्या नुकत्याच शिर्डी येथे झालेल्या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी तीन महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, असा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार प्रमुख पक्षही कामाला लागले आहेत.

> काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने महापालिका प्रशासकांना पत्र पाठवून प्रशासकांचे नाव, त्यांचा संपर्क क्रमांक, निवडणूक विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांचे नाव व त्यांचा संपर्क क्रमांक, निवडणूक विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या अशी माहिती मागविली होती. निवडणूक आयोगाने मागितलेली माहिती पाठविण्याचे काम महापालिकास्तरावर सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

दै.ठाणे जीवनदीप वार्त

पाच वर्षांपासून रखडलेल्या महापालिकेच्या निवडणुका कधी होतील, याची प्रतीक्षा कायम आहे. त्यात आता महापालिकेवर प्रशासक कोण? निवडणुकीचे काम पाहणारे अधिकारी कोण? यासंबंधी माहिती निवडणूक आयोगाने महापालिकेकडून मागवली आहे. क्रिकेट फुटबॉल डेली शेअर विधानसभा निवडणुकीत महायुतीचा जोरदार विजय झाल्यानंतर आता महापालिका निवडणुकीची चर्चा सुरू आहे. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेवर ता. २२ जानेवारीला सुनावणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या सुनावणीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होईल, अशी अटकळ बांधली जात आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती जमा करण्याचे काम निवडणूक आयोगामार्फत सुरू करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने महापालिका प्रशासकांना पत्र पाठवून प्रशासकांचे नाव, त्यांचा संपर्क क्रमांक, निवडणूक विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांचे नाव व त्यांचा संपर्क क्रमांक, निवडणूक विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या अशी माहिती मागविली होती. निवडणूक आयोगाने मागितलेली माहिती पाठविण्याचे सर्व काम पालिकास्तरावर सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## महाकुंभ मेळ्यात अग्नीतांडव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ वृत्तसेवा

प्रयागराज (उ.प्र.) उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभ मेळ्याला भीषण आग लागली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्याकरता अग्नीशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या आहेत. या आगीचे लोट दूरहून दिसत आहेत. दरम्यान, घटनास्थळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पोहोचले असून ते घटनेची चौकशी करत आहेत.

**१८ तंबू भस्मसात :** प्राथमिक अहवालांनुसार, कॅम्प साइटवर आग लागली आणि त्या भागात बसवलेल्या अनेक तंबूंना या आगीने वेढले. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) चे एक पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. आग विझवण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलीस आणि अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. या आगीत १८ तंबूंना आग लागली आहे.



## तटकरेंच्या पालकत्वामुळे शिंदेंसेनेत नाराजी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

रायगडच्या पालकमंत्रिपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमनेसामने आले. महायुतीमध्ये रायगडचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादीच्या वाट्याला आले. पण त्यामुळे शिवसेनेत मात्र धूसफूस सुरू झाली आहे. रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी शिवसेनेचे भरत गोगोवाले इच्छूक होते. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी आपल्या मनातील खदखद बोलून दाखवली होती. पण यावेळीही त्यांना पालकमंत्रिपदाने हुलकावणी दिली. पालकमंत्रिपदावरून शिवसेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

रायगडमधील काही शिवसैनिकांनी राजीनामा दिलाय. त्यामुळे शिंदेंसमोर नवा पेच निर्माण झालाय. शनिवारी महायुतीच्या पालकमंत्रिपदाची यादी जाहीर झाली.

रायगडचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादीच्या नेत्या आदिती तटकरे यांच्याकडे सोपवण्यात आले. भरत गोगावले यांच्या पदरी पुन्हा निराशा आली. त्यामुळे रायगडमधील गोगावले समर्थकांनी आक्रमक पवित्रा घेतला. मुंबई-गोवा महामार्ग अडवण्यात आला. रास्तारोको करत आपला राग आणि नाराजी व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी रायगडमधील शिवसैनिकांनी सामूहिक राजीनामे दिले आहेत.

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरुन राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध शिवसेना असा थेट सामना होता. राष्ट्रवादीच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे आणि शिवसेनेचे मंत्री भरतशेठ गोगावले यांच्यात थेट स्पर्धा होती. पुन्हा एकदा अदिती तटकरे यांनी बाजी मारली. पालकमंत्रिपद न मिळाल्यामुळे भरत गोगावले यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली.

**काय म्हणाले गोगावले?**

रायगडच्या पालकमंत्रिपदावरील निर्णय धक्कादायक आहे, ही अपेक्षा नव्हती, अशी नाराजी मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केली आहे. पालकमंत्रिपदाबाबद दिग्गजांसोबत अज्याप चर्चा झालेली नाही. रायगडमधील सहा आमदारांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना भेटून जिल्ह्यातील वातावरणाबाबत माहिती दिली होती. आत्ता जो निकाल आहे तो अनपेक्षीत आहे आणि मनाला पटणारा नाही, असे गोगावले म्हणाले. परंतु आमचे नेते एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य आहे, असे सांगायलाही गोगावले विसरले नाहीत.

### शिवसेनेत नाराजी
### ३८ पदाधिका-यांचे राजीनामे

> भरत गोगावले यांना पालकमंत्रिपद न मिळाल्यामुळे जिल्ह्यातील शिवसैनिक आक्रमक झाले. तब्बल ३८ पदाधिकाऱ्यांनी राजीनामाअस्त्र उगारले आहे. रायगडमधील शिवसेनेच्या विविध ३८ पदाधिकाऱ्यांनी आपला राजीनामा उपमुख्यमंत्री व सेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवला आहे. रायगडचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादीला दिल्याने निषेध व्यक्त केला. भरत गोगावले यांना डावलल्याने रायगड शिवसेनेत मोठी नाराजी आहे. त्याचेच पडसाद पडताना दिसत आहे.

## वसई-भाईंदरमध्ये महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी


वसई : वसई विरार मिरा भाईंदर शहरात महिलांवरील अत्याचारात २०२३ च्या तुलनेत वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत बलात्काराचे गुन्हे ४७ ने तर विनयभंगाचे गुन्हे ७७ ने वाढ झाली आहे. या मध्ये सामूहिक बलात्कार तसेच समाजातील प्रतिष्ठांकडून बलात्कारांच्या घटनांमध्ये वाढ झाली हे विशेष.



उपाययोजना केल्या जात असल्या तरी अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. २०२३ मध्ये वसई, भाईंदर मध्ये बलात्काराच्या ३६० आणि विनयभंगाच्या ४७७ घटना घडल्या होत्या. २०२४ मध्ये त्यात वाढ झाली आहे. २०२४ या वर्षात बलात्काराच्या ४०७ तर विनयभंगाच्या ५५५ घटना घडल्या आहेत. प्रेमाच्या जाळ्यात ओढून, फसवणूक करून, धमकावून, अश्लिल छायाचित्रांच्या आधारे ब्लॅकमेल करून बलात्कार करण्यात आले आहेत.

रस्त्यावरून जाणाऱ्या महिलांच्या विनयभंगातही वाढ झाली आहे. छेडछाड करणे, पाठलाग करणे, अश्लील शिविगाळ करणे, अश्लील संदेश पाठवणे अशा प्रकरणातही इतर कलमांप्रमाणे विनयभंगाचे गुन्हे दाखल केले जात इंस्टाग्राम हे तरुण मुलांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आहे मात्र याच इन्स्टाग्रामवरून बहुतांश गुन्हे घडले आहे. शिक्षक, डॉक्टर, राजकारणी अशा प्रतिष्ठित लोकांकडूनही बलात्काराच्या घटना घडल्या आहेत.

## सैफच्या हल्लेखोराला पाच दिवसांची कोठडी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता


**मुंबई :** मुंबई : सैफ अली खानच्या हल्लेखोराला पाच दिवसांची पोलीस कोठडी वांद्रे न्यायालयानं सुनावली आहे. आरोपीला पोलिसांनी रविवारी अटक केली होती. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं होतं.

**पाच दिवसांची पोलीस कोठडी :** अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आलं. अटक करण्यात आलेल्या आरोपीला मुंबई पोलिसांनी वांद्रे न्यायालयात हजर केलं. न्यायालयाने या आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अटक करण्यात आलेला संशयित बांगलादेशी नागरिक असल्याने याप्रकरणी आंतरराष्ट्रीय धागेदोरे असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी 14 दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयानं पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांना मिळवावी लागतील 'या' प्रश्नांची उत्तरं : चोरी व हल्ला प्रकरणातील मुख्य उद्देश काय होता? यामध्ये आणखी कोणी साथीदार सहभागी आहे का? एवढ्या कडेकोट बंदोबस्तात सुरक्षा यंत्रणांना चुकवून आरोपी थेट सैफ अली खानच्या घरात कसा प्रवेश करू शकला? आरोपीचा केवळ चोरीचा हेतू होता की त्याला खंडणी मागायची होती? की त्याला सैफ अली खानची हत्या करायची होती? त्या विविध प्रश्नांची उत्तरे मुंबई पोलिसांना आता अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून मिळवणे गरजेचे आहे.

**आरोपी बांगलादेशातील? :** ठाण्यातील घोडबंदर येथील हिरानंदानी इस्टेटजवळील लेबर कॅम्प परिसरातील जंगलातून पोलिसांनी आरोपीला अटक केली. त्याच परिसरात असलेल्या पंचतारांकित हॉटेलमध्ये आरोपी विजय दास या बनावट नावाने काम करत असल्याचे पोलिसांनी सांगितलं. अटक करण्यात आलेला आरोपी बांगलादेशातील झलोकाठी जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य आणखीनच वाढले आहे.

**आरोपीविरोधात कोणती कलमं? :** अटक करण्यात आलेल्या आरोपीविरोधात मुंबई पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम 311, 312, 331(4), 331(6) व 331 (7) नुसार गुन्हा नोंदवला आहे. भारतात प्रवेशास प्रतिबंध अधिनियम 1948 चे कलम 3 ए व 6 ए तसेच परकीय नागरिक आदेश कलम 3 (1) व 14 अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सैफ अली खानवर हल्ला झाल्यानंतर त्याच्यावर वांद्रे येथील लीलावती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रविवार हा उपचाराचा चौथा दिवस आहे.



## दादासाहेब फाळके यांचे नातू किरण फाळके यांचे निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**डोंबिवली :** भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांचे नातू गिटार वादक आणि ॲक्युपंक्चर थेरपिस्ट किरण फाळके यांचे शनिवारी सकाळी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने येथे निधन झाले. ते 78 वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंड असा परिवार आहे. डोंबिवलीतील पुस्तक अदान प्रदान कार्यक्रमात शुक्रवारी किरण फाळके यांचा उद्योग मंत्री उदय सामंत, भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला होता. शिव मंदिर स्मशानभूमीमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

60 वर्षांपासून किरण फाळके यांचे डोंबिवलीत वास्तव्य होते. डोंबिवली शहरात घडलेली स्थित्यंतरं त्यांनी जवळून अनुभवली होती. ॲक्युपंक्चर शास्त्राचा त्यांना अनुभव होता. 35 वर्षे ते गरजूंना मोफत उपचार देत होते. नुकतीच त्यांची भिवंडी येथील एका महाविद्यालयात मार्गदर्शक म्हणून म्हणून नियुक्ती झाली होती. या क्षेत्रात अनेक विद्यार्थी त्यांनी घडविले.

गिटार वाजवत गाणी गाऊन लोकांचे मनोरंजन करणे हा त्यांचा छंद होता. वाद्य वाजविण्यात ते निपुण होते. की बोर्ड, साऊथ अर्बन, गिटार, हवाईयन गिटार यांसारखी 5 ते 6 वाद्य त्यांना वादन करता येत होती. अलीकडे डिजिटल ऑडियो रेकॉर्डिंगच्या माध्यमातून त्यांनी दोन ध्वनिमुद्रिका तयार केल्या होत्या. आपल्या मोटार सायकल वरून त्यांनी डोंबिवली ते कन्याकुमारी आणि पाकिस्तान सरहद्दपर्यंत भारत भ्रमण केले होते. त्यांच्या निधनाने डोंबिवलीतील एक अष्टपैलू व्यक्तीमत्व हरपले आहे.

# अंगावर गांधी उठणे

## पथ्य, आहारात बदल, सवयीमध्ये बदल



महिलांमध्ये त्वचेवर गांधी उठण्याची तक्रार मोठ्या प्रमाणात आढळून येते. गांधीलमाशी चावल्यावर जशी लालसर, गोलाकार मंडले त्वचेवर येतात, तशाच प्रकारच्या या गांधी उठतात. त्या वेळी प्रचंड खाज, आग होणे ही लक्षणे असतात.

मुख्य म्हणजे त्वचेवर आग होत असली तरी अंगात मात्र बारीक थंडी वाजत असते. ताप नसला तरी तोंडाला चव नसते. मळमळून उलटी देखील काही रुग्णांत होते. या सर्व लक्षणांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही.

साधारणपणे संक्रांतीनंतर वातावरणात थोडा बदल होतो. पहाटे गारवा आणि नंतर मात्र उष्ण वातावरण होते. या बदलत्या स्थितीत गारव्यामुळे कफ, वात यांची वाढ होते आणि शरीरातील पित्ताबरोबर वाढलेले कफ, वात थंडी, खाज ही लक्षणे निर्माण करतात. विशेषतः पित्तप्रधान प्रकृतीमध्ये हा त्रास लवकर वाढतो. म्हणून वातावरण बदलताना, थंडीच्या दिवसांत या लक्षणांत वाढ होते.

गांधी उठल्यावर किंवा आधी नेमकी काय काळजी घ्यायची याची कल्पना यावी म्हणून मी हे सर्व तुम्हाला सांगितले. यादृष्टीने कारणांचा विचार केला, तर घराच्या भिंतींना ओल असणे, शहाबादी थंड फरशीवर बसून काम करणे, थंड वाऱ्यात काम करताना अंगात गरम उबदार कपडे न घालणे, पाण्यात काम झाल्यावर साडी खूप ओली झाली तरी न बदलणे या कारणांनी कफ, वात यांचे संतुलन बिघडते.

अशा परिस्थितीत आपल्या नकळत आपण चुकीचा आहारही घेतो. तिखट चमचमित खाणे, ठेचा वापरणे, जागरण करणे आणि चहा पिणे, आंबट ताक- दही वारंवार खाणे यामुळे पित्तप्रकोप होतो आणि त्वचेवर लालसर रंगाची आग होणारी मंडले निर्माण करतो.

थोडक्यात म्हणजे, ही जी कारणे मी सांगितली, त्यांचा विचार करून सवयींमध्ये बदल करायला हवा.

अंगावर गांधी उठत असल्यास आणि त्रास वारंवार होत असल्यास खरं तर तज्ज्ञ डॉक्टरांकडे जाऊन नियमितपणे चिकित्सा करून घ्यावी. पण, त्या वेळी एवढी खाज आणि आग होत असते, की थोडा आराम पडावा याकरिता उपाय करणे जरुरीचे असते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्वेटर, सनकोट, शाल घेऊन शरीर झाकावे. हाता-पायांना गार वारा लागू देऊ नये. ३-४ आमसुले पाण्यात भिजत घालावीत व ते पाणी अंगाला लावावे.

खाण्याचा सोडा पाण्यात मिसळून लावल्यासही फायदा होतो. हळदीपासून बनवलेले हरिद्राखंड हे औषध या गांधींवर उत्तम कार्य करते. दाह कमी करण्यासाठी आवळा पावडर, ज्येष्ठमध, गुळवेल, नागरमोथा समभाग एकत्र करून अर्धा चमचा पावडर पाण्याबरोबर किंवा मोरावळयाबरोबर घ्यावी, त्यामुळे खाज कमी होते. आमसुलाचे सार, चटणी खावी. कोकम सरबत, आवळा सरबत घेतल्यास पित्त- कफ- वात यांचे संतुलन सुधारते.

सुतशेखर वटी, कामदुधा वटी यांसारखी अनेक औषधे उत्तम कार्य करतात; पण त्यांचा डोस व्यक्तीपरत्वे बदलतो. म्हणून मनाने औषधे घेऊ नयेत. वैद्यांचा सल्ला घेऊन औषधे सुरू करावीत.

**आहारात बदल**

लसणाची फोडणी देऊन मुगाचे पातळसर वरण करावे. भाकरी, पोळी, साजूक तूप, लोणी, आमसूल चटणी जरूर असावी. दही वर्ज्य करावे. तिखट, तळलेले खाऊ नये. शिळे खाऊ नये.

**सवयीमध्ये बदल**

कामाच्या व्यापात काही वेळा साध्या साध्या गरजाही भागवण्याचा आपण कंटाळा करतो. उदा. पाणी पिणे, लघवीला जाणे, वेळच्या वेळी पोट साफ होणे या गोष्टींत विलंब करू नये. अंघोळीसाठी गरम पाणी वापरावे, त्यात कडुलिंबाची पाने घातली तर जंतुघ्न म्हणून कार्य होते. बाहेर जाताना विशेषतः पहाटे, रात्री स्वेटर घालून जावे. गार वारा खाज निर्माण करतो म्हणून स्वेटर / सनकोट घालून पूर्ण हात झाकावेत.

आपल्या घरातील नेहमीच्या वापरातील काही गोष्टींचे औषधी गुणधर्म महिलांना माहीत असतील. लक्षणांमध्ये वाढ होणे आपण स्वतःच रोखू शकतो. आपला आहार कसा असावा यासंबंधी प्रत्येक स्त्रीने जागरूक असायला हवे, कारण इतरांचे आरोग्य जपणे आणि स्वतःचे आरोग्य उत्तम ठेवणे ही मोठी जबाबदारी तिला पेलायची असते.

### अंगावर गांधी उठणे अर्थात शीतपित्त !

**अनेक जणांना अंगावर पित्ताच्या गांधी उठण्याची समस्या असते.आपणास कशाची तरी ॲलर्जी आहे की काय असे वाटायला लागते.विषारी कीडा उतल्यावर जशा गाठी उठतात तशाच या गाठी अचानक येतात. खाजसुद्धा भरपूर असते. पाण्याशी किंवा थंड हवेशी संपर्क आला,खाजवले की तेवढ्याच भागावर या गाठी उठतात. खेड्यात यास बोली भाषेत सईतपीत असे म्हणतात.**

**आयुर्वेदात याचे 'शीतपित्त' असे फार सुरेख वर्णन केले आहे. याचे खाज येणे, न येणे, गाठेची कडा जाड असणे, मधेच खड्डा पडणे असे अनेक छोटे छोटे प्रकार पडतात. म्हणून सर्वात प्रथम आपण वैद्याकडे जाऊन आपले योग्य निदान करून घेणे आवश्यक आहे.**

**थंड पदार्थाचे सेवन, थंड वारा, थंड पाण्याचा संपर्क यामुळे हा आजार उद्भवतो.काही जणांना गवार, शेवगा, वांगी, दही, हरभरा डाळीचे पदार्थ खाण्यात आले की त्रास वाढतो.मांसाहार ,चहा,उष्ण व मसालेदार ,आंबट पदार्थ ,मीठ यांच्या अतिसेवनाने त्रास जास्त होतो.**

**यामध्ये तुप व मीरपुड एकत्र करुन लावणे,कांद्याचा रस सर्वांगाला लावणे, खोबरेल तेल कोमट करून सर्वांगाला लावणे याने लगेच बरे वाटते.त्रास जास्त असेल तर वैद्याच्या सल्ल्याने योग्य औषधोपचार व वमन, विरेचन व रक्तमोक्षण इत्यादी पंचकर्म शास्त्रोक्त पद्धतीने करुन घ्यावे.**

# श्री कृष्ण उवाच

महाभारताचे युद्ध सुरु होण्यापूर्वी श्रीकृष्णाने अर्जुनाला दिलेला उपदेश म्हणजे श्रीमद् भगवद्गीता. हा महाभारतातील भीष्मपर्वाचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. गीतमध्ये १८ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. या भगवद्गीतेत श्रीकृष्ण आणि अर्जुनाचा संवाद लिहिला आहे. या ग्रंथामुळे मनुष्याला मुक्तीचा मार्ग मिळत नाही तर माणूस नव्याने घडण्याचे कार्य होते. यामध्ये कर्म योगाचा संदेश देताना राष्ट्रीय उत्थनाच्या कार्याबाबत नवीन प्रेरणा देते. गीतेच्या शिकवणीतून श्रीकृष्णाने मनुष्याला जीवन जगण्याचा योग्य मार्ग शिकवला आहे. कर्माद्वारे भगवंताकडे नेणारा मार्ग त्यांनी दाखविला आहे. ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीसाठी जीवन जागण्याची उत्तम सूत्रे आहेत. कृष्ण सांगतात की, जर एखाद्या व्यक्तीने आपले मन शांत आणि स्थिर ठेवून प्रयत्न केले तर त्याला नक्कीच चांगले परिणाम मिळतील. जर तुम्हाला आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर यशस्वी व्हायचे असेल तर भगवद्गीतेतील ५ गोष्टी कायम लक्षात ठेवा.

1. जीवनातील प्रत्येक संघर्षाला सामोरे जा

मानवी जीवनातील संसारिक सुख भगवंतालाही सुटले नाही. अशावेळी श्रीकृष्ण सांगतात की परिस्थितीपासून लांब जाण्याऐवजी त्यासमोर तितक्याच ताकदीने उभे राहाणे गरजेचे आहे. काम करणे हे मानवी जीवनातील पहिले आणि महत्त्वाचे कर्तव्य आहे. आपल्या कृतीतूनच या समस्यांवर मात करता येते.

2. आरोग्याची काळजी

श्रीकृष्ण सांगतात की, विजय मिळवण्यासाठी व्यक्तीने निरोगी असणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. शारीरिक शरीरासोबत मानसिक शांतता देखील जास्त गरजेची आहे. शरीर निरोगी असेल तर शक्ती मिळते आणि मन देखील प्रतिकूल परिस्थितीत तीव्रतेने काम करते. त्यामुळे माणसाला प्रत्येक क्षेत्रात यश मिळते.

3. बाहेरच्या जगाचे ज्ञानही महत्त्वाचे

श्रीकृष्ण म्हणतात की, मनुष्य जीव हा बाहेरच्या जगात वावरण्यापेक्षा त्याला पुस्तकी ज्ञान जास्त आवडते. परंतु, कोणत्याही गोष्टीत पुस्तकी ज्ञान योग्य ठरत नाही. माणसाने जीवनाच्या प्रत्येक पैलुतून काही ना काही शिकत राहायला हवे.

4. नात्याला वेळ द्या

श्रीकृष्ण म्हणतात की, नात्यात अनेकदा वाद विवाद होतात. त्यात बोलले जाणारे अपशब्द नेहमी नात्यात दूरावा तयार करतात. अशावेळी शाब्दिक वाद करण्यापेक्षा एकमेकांना समजून घ्या. नाते अधिक दृढ करण्यासाठी त्याला पुरेसा वेळ द्या

# सावध व्हा!

## फोन चार्ज करताना या चुका टाळा

अनेकांना फोन सतत वापरण्याची सवय असते. सारखा फोन वापरल्याने फोनचे चार्जिंग कमी होते. अनेकांना फोन सतत वापरण्याची सवय असते. सारखा फोन वापरल्याने फोनचे चार्जिंग कमी होते. चुकीच्या पद्धतीने फोनला चार्जिंग केल्यास फोनच्या बॅटरीचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे मोबाईल चार्ज करताना काळजी घेणे आवश्यक आहे. फोन चार्ज करताना या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या.

**फोन पूर्ण चार्ज करू नका-**

अनेक लोक फोन १०० टक्के चार्ज करतात. पण एका रिपोर्टनुसार, फोन १०० टक्के चार्ज केल्याने फोनची बॅटरी खराब होते.

**फोन डिस्चार्ज होईपर्यंत वापरू नये**

काही लोक फोनचा वापर फोन पूर्णपणे डिस्चार्ज होईपर्यंत करतात. पण असं केल्याने फोनची बॅटरी खराब होऊ शकते. तसेच बॅटरीची लाईफ देखील कमी होते. फोनची बॅटरी ही लिथियमची असते. त्यामुळे फोन पूर्णपणे डिस्चार्ज होण्याआधीच चार्जिंगला लावा.

**इलेक्ट्रिक उपकरणांपासून फोन ठेवा दूर**

फ्रिज, वॉशिंग मशीन, डीव्हिडी प्लेयर इत्यादी उपकरणांजवळ फोन चार्जिंगला लावू नका. कारण इलेक्ट्रिक उपकरण गरम होतात. त्यामुळे या उपकरणांच्या जवळ फोन चार्जिंगला लावल्याने फोन खराब होऊ शकतो.

**फोन चार्जिंगला लावून कॉलवर बोलू नका-**

फोन चार्ज करत असताना कॉलवर बोलणे टाळा. जर तुम्ही चार्जिंग सुरू असताना कॉलवर बोलत असाल तर तुम्हाला करंट लागू शकतो.

**खराब क्वालिटीचा चार्जर वापरू नका**

बरेच लोक कोणत्याही स्मार्टफोनच्या चार्जरने स्मार्टफोन चार्ज करतात. यामुळे स्मार्टफोनची बॅटरी खराब होऊ शकते. खराब क्वालिटीचा चार्जर बॅटरीच्या बॅकअपवर वाईट रीतीने परिणाम करू शकतो. म्हणून नेहमी ओरिजनल चार्जर वापरा.

**रात्रभर स्मार्टफोन चार्ज करू नका**

बरेच लोक झोपताना आपला स्मार्टफोन चार्जिंगवर ठेवतात आणि नंतर सकाळी बाहेर काढतात. जास्त चार्जिंग केल्याने आपले डिव्हाइस जास्त गरम होते आणि बऱ्याच वेळा असे केल्याने बॅटरी खराब होऊ शकते. त्यामुळे रात्रभर मोबाईल चार्ज करु नका.

**ओरिजनल चार्जरचा वापर करा**

फोनची बॅटरी ख?ाब होऊ नये, असे तुम्हाला वाटत असेल तर आपल्या स्मार्टफोनला नेहमी ओरिजनल चार्जरने चार्ज करा. जर तुम्ही दुसऱ्या किंवा लोकल चार्जरने फोन चार केल्यास त्याचा परिणाम बॅटरीवर पडू शकतो. वारंवार अन्य चार्जरने फोन चार्ज केल्यास फोनची बॅटरी खराब होऊ शकते.

**वारंवार चार्ज करू नका**

काही लोक मोबाइलला वारंवार चार्ज करतात. बॅटरी ९० टक्के असल्यावरही ते चार्ज करतात. स्मार्टफोनला वारंवार चार्ज केल्याने त्याचा परिणाम बॅटरीवर पडत असतो. त्यामुळे फोनला वारंवार चार्ज करणे टाळावे.

**बॅटरी २० टक्के झाल्यानंतर फोन चार्ज करा**

फोनची बॅटरी जर २० टक्के झाली किंवा त्यापेक्षा कमी झाल्यानंतर फोनला चार्ज करणे चांगले आहे. त्यामुळे फोनच्या बॅटरीवर कोणताही परिणाम होत नाही.

# स्ट्रेस मॅनेजमेंट जमलं तर...?



आपल्या रोजच्या आयुष्यातल्या घटना, कामं, कामांचा दबाव यामुळे मनावर सतत ताण येत राहातो. ताण ही क्रियेची प्रतिक्रिया असली तरी अनेकांच्या बाबतीत ताण ही कायमस्वरुपाची बाब होते. ताण तणाव ही गंभीर समस्या असून यामुळे शारीरिक समस्यांसोबतच वर्तन समस्याही निर्माण होतात. शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम करणाऱ्या ताणाचं व्यवस्थापन जमलं तर ताणामुळे निर्माण झालेले शारीरिक आणि मानसिक आजार बरे होण्यास मदत होते. ताण व्यवस्थापन हा आनंदी जगण्याचा मार्ग आहे. ताण व्यवस्थापन म्हणजे ताण हाताळता येणं, ताणाच्या परिस्थितीतही मानसिक संतुलन न ढळू देता स्थिर राहाणं. ताण व्यवस्थापन हे एक आवश्यक जीवनकौशल्य असून ते छोट्या छोट्या गोष्टी केल्यास सहज जमू शकतं असं आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. दीक्षा भावसार सवलिया सांगतात.

ताण व्यवस्थापन का महत्वाचं?

डॉ. दीक्षा भावसार सवलिया यांच्या मते ज्ञात- अज्ञात अशा अनेक रोगांच्या बाबतीत तणावाची भूमिका मोठी असते. मधुमेह, थायरॉइड, स्थूलता, एंडोमेट्रियोसिस , हार्मोनल इम्बॅलन्स, वंध्यत्व, पाळीसंबंधी समस्या, अल्सर, कोलायटिस, आतड्यांचे आजार, पचनाचे विकार, भीती, मायग्रेन या समस्या निर्माण होण्यात तणाव कारणीभूत ठरतो. त्यामुळेच तणाव व्यवस्थापन जमणं आवश्यक आहे. तणाव व्यवस्थापन जमल्यास पोटाच्या समस्या, पचनाचे विकार, हार्मोनसंबंधी समस्या बऱ्या होण्यास मदत होते. तणाव व्यवस्थापनानं वजन नियंत्रित राहातं. तणाव व्यवस्थापनानं संधिवात, त्वचेसंबंधी विकार, शरीरावर सूज यासरख्या समस्यांची तीव्रता आणि धोका कमी होतो. ताण व्यवस्थापन हे एक कौशल्य आहे. ते जमण्यासाठी कोणता क्लास किंवा प्रशिक्षणाची गरज नाही. डॉ. दीक्षा ताण व्यवस्थापनाचे, ताण कमी करण्याचे सोपे मार्ग

ताण कमी करण्यासाठी

१. एक सलग काम केल्यानं शरीरावर आणि मनावर ताण येतो. काम करताना छोटे छोटे ब्रेक घेऊन थोडा वेळ निसर्गाच्या सान्निध्यात जाणं, मोकळा श्वास घेणं आवश्यक आहे. या छोट्याशा कृतीतून , निसर्गाच्या जवळ जाण्यातून आपण स्वतःच्या जवळ येतो त्याचा आलेला ताण निवळण्यास उपयोग होतो.

२. ताण आलेला असल्यास आपल्या आवडीचं काहीतरी काम करावं. असं काम ज्यातून आपल्याला आनंद मिळतो, जे काम मनापासून करावसं वाटतं. आपल्या आवडीचं काम करायला मिळाल्यास छान वाटतं आणि ताण निघून जातो.

३. मनावर आलेला ताण घालवण्यासाठी आपल्या जवळच्या आणि आवडत्या व्यक्तींसोबत थोडा वेळ फोनवर बोलावं. शक्य असल्यास त्यांना भेटावं. प्रिय व्यक्तींच्या भेटीगाठी घेणं, त्यांच्याशी हसत खेळत गप्पा मारणं हा ताण घालवण्याचा सोपा उपाय आहे. यामुळे चित्तवृत्ती प्रसन्न होतात.

४. रोज व्यायाम केल्यास रोजच्या जगण्यातील ताण हाताळण्याचं बळ मिळतं. व्यायामामुळे शरीर आणि मनावरचा ताण दूर होतो. व्यायामासोबतच ध्यानधारणा केल्यास मनातल्या नकारात्मक विचारांची जागा सकारात्मक विचार घेतात. मनात चांगले विचार येतात. व्यायाम आणि ध्यान यामुळे तणाव निर्माण करणारं कॉर्टिसॉल या हार्मोनचा प्रभाव कमी होवून शरीरात हॅपी हार्मोन्स स्त्रवतात.

५. ताण आलेला असल्यास लक्ष ताणाच्या गोष्टीवरुन दुसऱ्या गोष्टीकडे वळवण्यासाठी घरातली आवरा आवरी करणं, कपाट नीट नेटकं करणं, स्वयंपाक करणं किंवा थोडं बागकाम करणं ही कामं उपचारासारखी काम करतात. भौतिक स्वरुपातल्या गोष्टी नीट नेटक्या करण्यानं भावनात्मक व्यवस्थापनाला चालना मिळते.



## घरच्या घरी तयार करा बीटरूट हलवा,

काही जणांना जेवणानंतर किंवा जेवणापूर्वी गोड पदार्थ खाण्याची सवय असते. चॉकलेट, क्रीम बिस्कीट, आईस्क्रीम खाण्याऐवजी पौष्टिक पदार्थाचे सेवन करण्यावर भर द्यावा. तुम्हालाही गोड-धोड खायला भरपूर आवडतं का? चला तर आज जाणून घेऊया बीटरूटपासून पौष्टिक आणि स्वादिष्ट हलवा तयार करण्याची सोपी रेसिपी. या रेसिपीमुळे तुमच्या शरीराला पोषण तत्त्वांचाही पुरवठा होईल आणि जीभेचे चोचलेही पुरवले जातील.

**साहित्य :** ४ मध्यम बीट , १ कप दूध , १ कप तूप ३/४ कप साखर, आवश्यकतेनुसार हिरवी वेलची, आवश्यकतेनुसार काजू

**कृती :** तुपात किसलेले बीट शिजवून घ्या पॅनमध्ये तूप गरम करत ठेवा. तूप वितळल्यानंतर तसंच गरम झाल्यानंतर त्यामध्ये काजूचे काप फ्राय करा. यानंतर पॅनमध्ये किसलेले बीट घ्या आणि नीट शिजू द्या. थोडेसं आणखी तूप घालून सर्व सामग्री ढवळत राहा. पाच मिनिटांनंतर पॅनमध्ये एक कप दूध ओता आणि सर्व सामग्री १५ मिनिटांसाठी शिजू द्यावी. आपल्याला हवे असल्यास हलव्यासाठी आणखी दुधाचा समावेश करू शकता. बीट मऊ झाल्यानंतर त्यामध्ये ३/४ कप साखर मिक्स करा. साखर विरघळेपर्यंत सर्व सामग्री नीट ढवळत राहा. पाच ते सात मिनिटे सर्व सामग्री नीट शिजल्यानंतर वेलची पावडर मिक्स करा. यानंतर वरून दोन चमचे तूप सोडा. यामुळे हलवा अधिक चविष्ट होईल. बीटरूट गरमागरम हलवा तयार आहे.

# जेवल्यानंतरच्या या दोन सवयींमुळेच वजन वाढतंय..

**पहिली चूक**

जेवताना पाण्याचा ग्लास आपल्या शेजारी भरून ठेवलेलाच असतो. आता उन्हाळ्यात तर ग्लास पुरत नाही म्हणून तांब्याभरून पाणी आपण घेतलेलं असतं. जेवण करताना आणि जेवण झाल्यावर आपण भरपूर पाणी गटागटा पिऊन टाकतो. पोट भरलेलं जाणवतं तरी पाणी पितोच... हीच सवय नेमकी वजन वाढीसाठी मदत करते. जेवण करताना आणि जेवण झाल्यानंतर काही काळासाठी शक्यतो पाणी पिऊ नये. पाण्याचा ग्लास शेजारी भरून नक्की ठेवा. कंट्रोल झालं नाही तर अगदी एकेक घोट पाणी प्या. पण जेवताना आणि जेवण झाल्यानंतर भरपूर पाणी पिऊ नका. यामुळे अन्नाचे व्यवस्थित पचन होत नाही आणि चयापचय क्रियेत अडथळे आल्याने शरीरावर चरबीचे थर जमा व्हायला सुरुवात होते. त्यामुळे जेवण झाल्यानंतर अर्ध्या तासाने भरपूर पाणी प्या.

**दुसरी चुक**

दुसरी चुक म्हणजे जेवण झाल्यानंतर अर्ध्या तासाच्या आतच झोपणे. आजकाल मोठ्या शहरात काम करणारे लोक ऑफिस संपवून घरी येतात तेव्हाच रात्रीचे ९- ९: ३० झालेले असतात. भरपूर भूकही लागलेली असते. अशावेळी मग घरी आल्यावर फ्रेश होऊन जेवण करेपर्यंतच झोपण्याची वेळ होते. दिवसभराचा थकवा आलेलाच असतो. त्यामुळे मग सुस्तीही येते. त्यामुळे नाईलाजाने अनेक जण जेवतात आणि झोपतात. ही सवयही वजन वाढण्यास कारणीभूत ठरते.





# केडीएमसीची प्लासिक विरोधी कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाक्षेत्रात एकल प्लास्टिक वापर करणार्या आस्थापना विरोधात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने दंडात्मक कारवाई चा बडगा सुरू ठेवला आहे.

कल्याण डोंबिवली परिक्षेत्रात पर्यावरणाच्या हानीस कारणीभूत ठरणाऱ्या एकल प्लास्टिक विरोधात कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली "क" प्रभागाचे सहा. आयुक्त धनंजय थोरात, स्वच्छता अधिकारी संदीप खिस्मतराव, स्वच्छता निरीक्षक जगन्नाथ वड्डे आणि त्यांच्या पथकाने शनिवारी कल्याण पश्चिम येथील लक्ष्मी मार्केट मधील 40 आस्थापनांची पाहणी केली आणि त्यात एकल प्लास्टिकचा वापर करीत असलेल्या दोन दुकानदारांवर रक्कम रु. १५ हजारांची दंडात्मक कारवाई करून दोन किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

आपल्या परिसरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नागरिकांनी एकल प्लास्टिक वापराऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# टपाल कार्यालयांच्या दुरावस्थेमुळे नागरिक त्रस्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहरातील टपाल कार्यालयांची झालेली दुरावस्था, काही टपाल कार्यालये हद्दीबाहेर गेल्याने नागरिकांची होणारी ससेहोलपट आणि अपुऱ्या सुविधा याबाबत नागरिकांकडून टपाल कार्यालयांबाबत तक्रारी सुरू झाल्या आहेत. या बाबत आमदार संजय केळकर यांनी नुकतीच टपाल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेत त्यांना सूचना केल्या. तसेच प्रशासनाच्या मदतीबरोबरच आवश्यक निधी उपलब्ध करून देणार असल्याची माहिती त्यांनी दिली.ठाणे शहरातील सर्व टपाल कार्यालये सक्षमपणे होण्यासाठी, नवीन टपाल कार्यालये निर्माण करण्यासाठी आणि स्थलांतरीत झालेली कार्यालये पुन्हा मूळ जागी आणण्यासाठी आमदार संजय केळकर यांनी संबंधित नागरिक आणि टपाल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेतली. कोलशेत येथील सॅण्डोज बाग टपाल कार्यालयाचे नामकरण कोलशेत टपाल कार्यालय करण्याबाबत केळकर यांनी अधिकाऱ्यांना सूचना केली आहे. पूर्वीचे सॅण्डोज हे नावच आता अस्तित्वात नसल्याने टपालाची जागा कोलशेत भागात असल्याने त्याचे नामकरण करण्याबाबत त्यांनी सूचना केली. तसेच जे.के. ग्राम टपाल कार्यालयासाठी जी जागा उपलब्ध केली आहे. ती तळघरात असल्याने ती बदलून पालिकेकडे नवीन जागेसाठी पाठपुरावा करणार असल्याचे केळकर यांनी सांगितले.

# भिवंडीतओला चालकाची हत्या

## निर्घृण हत्याकांडाने भिवंडीत खळबळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पाइपलाईन लगतच्या झाडाझुडपात एका तरुणाचा मृतदेह आढळला. हा तरुण ओला चालक असून त्याची अज्ञात आरोपींनी निर्घृण हत्या केल्याचं समोर आलं आहे. तरुणाच्या हत्येनंतर आरोपी आरोपी फरार आहेत. याप्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्रम इकबाल कुरेशी (वय २२ वर्ष) असं हत्या झालेल्या ओला चालक तरुणाचं नाव आहे.



सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत अक्रम हा ओला चालक मुंबई शहरातील जोगेश्वरी भागात कुटुंबासोबत राहत होता. तो मूळचा उत्तर प्रदेश राज्यातील प्रतापगड जिल्ह्याचा रहिवाशी होता. मृत अक्रम हा नेहमीप्रमाणे १७ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास ओला कार घेऊन निघाला होता, दुपारपर्यत तो कुटुंबाच्या संपर्कात होता, मात्र दुपारनंतर त्याचा मोबाईल बंद येत असल्याने जीपीआर सिस्टिमद्वारे त्याचं लोकेशन शोधायचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याचं शेवटचं लोकेशन भांडुप परिसरात दिसून आलं. त्यानंतर मात्र लोकेशन दिसत नसल्याने मध्यरात्री ओशीवारा पोलीस ठाण्यात अक्रम बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली.

या तक्रारीनुसार पोलीस शोध घेत असतानाच मृत अक्रम याच्या नातेवाईकांच्या मोबाईलवर अक्रम चालवत असलेल्या ओला कार मौजे पोगांव, ता. भिवंडी गावच्या हद्दीत तानसा - वैतरणा पाईप लाईनच्या जवळ असलेल्या झाडा-झुडपात दगडाने ठेचलेल्या अवस्थेत अक्रमचा मृतदेह आढळून आल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच १८ जानेवारी रोजी शनिवारी सकाळच्या सुमारास अक्रमचा मृतदेह असल्याची खात्री पटली. त्यानंतर घटनास्थळ असलेल्या पोगांव येथील पाईप लाईन रस्त्यावर उभी असलेली ओला कार ताब्यात घेण्यात आली. तसंच मृतदेहचा पंचनामा करत शवविच्छेदनासाठी भिवंडीतील स्वर्गीय इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात रवाना केला.

त्यानंतर मृत अक्रमचा भाऊ खुशिद आलम इकबालुद्दीन कुरेशी यांच्या फिर्यादीवरून भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला असून भिवंडी तालुका पोलीस अज्ञात आरोपींचा शोध घेत आहेत

# खारेगाव उड्डाण पुलावरील दुभाजकाचा भाग कोसळला

ठाणे : मुंबई महानगरातील वाहतूकीसाठी महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई-नाशिक मार्गावरील खारेगाव येथील खाडी पुलाच्या दुभाजकाचा काही भाग कोसळून खाली पडला. भगदाड पडलेल्या भागात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मार्गरोधक लावण्यात आले आहेत. तर, पुलावरील रस्ते मात्र सुस्थितीत असून या पुलावरील दोन्ही बाजूची वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे. तसेच या दुभाजकाच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रशासनाकडून देण्यात आली. उरण येथील जेएनपीटी बंदरातून नाशिक, गुजरात आणि भिवंडीच्या दिशेने अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. ही वाहने मुंब्रा बाह्यवळण मार्गे मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव येथून नाशिक तसेच भिवंडी मार्गे वाहतूक करतात. काही वाहने भिवंडी मार्गे गुजरातच्या दिशेने जातात. याशिवाय, इतर खासगी वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. या मार्गावर एखादे वाहन बंद पडले किंवा अपघात झाला तर, या मार्गावर कोंडी होते आणि त्याचा परिणाम मुंबई महानगरातील इतर रस्त्यांवरही होतो. त्यामुळे हा मार्ग महत्वाचा मानला जातो. तसेच या मार्गाला समृद्धी मार्ग जोडण्यात येणार असून त्यासाठी हा रस्ता रुंद करण्याचे काम सुरू आहे. खारेगाव खाडी पुल हा ३० ते ३५ वर्षे जुना झाला असून त्याशेजारी नवी पुलांची उभारणी करण्यात येत आहे. हे काम झाल्यानंतर जुना पुलाच्या मजबुतीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. असे असतानाच, शनिवारी रात्री खाडी पुलाच्या दुभाजकाचा काही भाग कोसळून खाली पडला. याठिकाणी नवीन खाडी पुलाचे काम करीत असलेल्या कामगारांनी हा प्रकार पाहून राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना याबाबत कळविले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी धाव घेऊन भगदाड पडलेल्या भागात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मार्गरोधक लावले, अशी माहीती सुत्रांनी दिली.

# उल्हासनगरच्या आयुक्तांसमोर शहर विकासाची आव्हाने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी

उल्हासनगर : राजकीय हस्तक्षेप व प्रशासकीय उदासिनतेपुढे कोणताही आय ए एस आयुक्त उल्हासनगरात यायला धजावत नाही. साडेचार महिन्यांचे आयुक्त विकास ढाकणे यांनी दरम्यान अनेक प्रशासकीय धोरणांच्या पुनर्रचनेतुन शहराला वेग देण्याचा प्रयत्न केला. परंतु, शहराची ढासळलेली प्रतिमा व राजकीय दबावतंत्र यामुळे ढाकणे यांचे उल्हासनगरात मन रमेना. ढाकणे यांना मंत्रालयात उपसचिवपदी नियुक्ती मिळाली. आणि, नुकताच उल्हासनगर आयूक्त पदाचा कारभार मनीषा आव्हाळे यांनी स्वीकारलाय. या शहरातील कोलमडून पडलेली प्रशासकीय व्यवस्था आणि राजकीय हस्तक्षेपांवर मात करण्याचे मोठे आव्हान नवनियुक्त आयुक्त पेलतील का, हि उत्सुकता शहराला लागलीय.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय ढाकणे यांची बदली झाल्यानंतर आयुक्तपदाचा तात्पुरता कार्यभार अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्याकडे होता. मनिषा आव्हाळे या उल्हासनगरच्या पहिल्या महिला आयुक्त असल्याने शहर वासियांच्या त्यांच्याकडून अपेक्षा उंचावल्या आहेत. २०१८ मधील देशातील ३३ व्या क्रमांकावरील त्या आय ए एस आहेत. परंतु आगामी काळात या शहरात त्यांची परखड कार्यपद्धती पाहणे हे अपेक्षित ठरणार आहे. ज्यात, त्यांच्या पुढं शहरवासीयांच्या उडालेल्या मूलभूत सुविधांचा बोजवारा हे प्रामुख्याने मोठं आव्हान असेल. ठिक



ठिकाणी खोदुन ठेवलेले खड्डे, धुराळा, क्षमता ओलांडलेले डंपिंग ग्राउंड,पाणी टंचाई, नगररचना, आरोग्य विभाग, सामन्य प्रशासन, कर, शिक्षण व मालमत्ता विभागातील बोकाळलेल्या भ्रष्टाचारावर अंकुश लावण्याचे शिवधनुष्य त्यांना पेलावे लागेल. प्रत्येक विभागात वर्षानुवर्षे ठाण मांडून बसलेलेले अधिकारी, अपात्रांना मिळालेले प्रभारी कार्यभार, अधिकार्यांच्या गैंग यांना आयुक्तांना धक्का द्यावा लागणार आहे.

शहरातील अनधिकृत बांधकामे, वाहतूक कोंडी, प्लास्टिक माफियांना आळा घालणे, सार्वजनिक बांधकाम विभागातील सावळागोंधळ, माजी नगरसेवकांची मिलिभगत, कंत्राटी कामगारांचे शोषण, निविदा घोटाळे यांना नियंत्रित करून पारदर्शक प्रशासन देणारी अनेक आव्हानं मनिषा आव्हाळे यांच्या समोर उभी आहेत. आयुक्त या समस्यांना कसे तोंड देतात व शहराला विकासाची कशी दिशा देतात हे आगामी काळात स्पष्ट होईल.

नवनियुक्त आयुक्तांच्या विभाग प्रमुखांना सुचना....

* सर्व विभाग प्रमुखांनी अत्यावश्यक फाईली थेट आयुक्तांना पृष्ठ संख्या व महत्त्वपूर्ण मुद्यांसह ४ दिवस आधी सादर कराव्यात .
* विभाग प्रमुखांनी पीपीटी द्वारे आपल्या विभागातील कर्मचारी संख्या, त्यांची कार्ये, योजना व त्यां पुढील समस्या निहाय माहिती द्यावी.
* विभाग प्रमुखांनी आपल्या मासिक आणि साप्ताहिक जबाबदाऱ्या व योजनांचा तक्ता सादर करावा.
* व्हाट्सअप ग्रुप वर एका समूहात एकच अधिकारी असावा, ज्यात कामकाजा व्यतिरिक्त पोस्ट नसाव्यात.
* कार्यालयातील स्वच्छता, लेखा परीक्षण, अभिलेख आणि बैठक व्यवस्थेस प्राथमिकता दिली जावी.
*आगामी ३ महिन्यात पालिकेचे ई- कार्यालय व्हावे.
* सातत्याने होणारे विशेष सरकारी निर्णय व त्यांची अंमलबजावणी आयुक्त आणि विभाग प्रमुखांच्या निर्देशात काटेकोरपणे व्हावी.

# केंद्र व राज्य सरकारी कर्मचा-यांना आठव्या वेतन आयोगाचे वेध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते आणि पेन्शन रिशेड्यूलिंग करण्यासाठी भारत सरकार दर 10 वर्षांनी वेतन आयोगाची स्थापना करते. हे आयोग सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार आणि राहणीमान सुधारण्यासाठी सूचना देते. अलिकडेच आठव्या वेतन आयोगाची स्थापना जाहीर झाली आहे, ज्यामुळे कर्मचारी आणि पेन्शनधारकांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. आता प्रश्न असा उद्भवतो की जेव्हा हा वेतन आयोग लागू होईल तेव्हा कोणत्या राज्याला याचा प्रथम लाभ होईल. यासोबतच असा प्रश्न देखील आहे की आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर कोणत्या राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार सर्वात जास्त वाढेल. चला, या बातमीत याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊया.

### आठवे वेतन आयोगाचा राज्यांवर परिणाम

आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी प्रथम केंद्रीय कर्मचाऱ्यांवर लागू केल्या जातील. यानंतर, राज्यांनाही त्यांची अंमलबजावणी करावी लागेल. सातव्या वेतन आयोगाच्या वेळी, बहुतेक राज्यांनी केंद्राच्या शिफारशी स्वीकारल्या होत्या. परंतु, प्रत्येक राज्यासाठी ही पद्धत आणि वेळ मर्यादा वेगळी असेल.

सोप्या शब्दांत सांगायचे तर, केंद्र ज्या वेळेस आपल्या कर्मचाऱ्यांवर आठवा वेतन आयोग लागू करेल त्याच वेळेस राज्य कर्मचाऱ्यांवरही तो लागू करणे आवश्यक नाही. आता आपण जाणून घेऊया की नवीन वेतन आयोगाच्या शिफारशी राज्यांना कशा लागू होतात.

### कशा लागू होतात शिफारशी?

खरंतर, जेव्हा केंद्र सरकार वेतन आयोगाच्या नवीन शिफारशी लागू करते, तेव्हा ते राज्यांना त्या कशा लागू करायच्या याबद्दल मार्गदर्शक तत्त्वे देखील जारी करते. यानंतर, प्रत्येक राज्य त्यांच्या बजेट आणि कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार एक योजना आखते. राज्ये त्यांच्या गरजा आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन वेगवेगळे वेतन मॅट्रिक्स तयार करतात. परंतु, सध्याचे वेतन नवीन वेतनश्रेणीत रूपांतरित करण्यासाठी फिटमेंट फॅक्टरचा वापर केला जातो. केंद्रही तेच करते.

उदाहरणार्थ, सध्या फिटमेंट फॅक्टर २.५७ आहे, परंतु जर तो २.८६ पर्यंत वाढवला तर तुमचा सध्याचा मूळ पगार २.८६ ने गुणाकार केला जाईल. यानंतर जो नवीन आकडा येईल तो तुमचा वाढलेला मूळ पगार असेल. कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता (DA) महागाईनुसार वाढवला जातो. जर आपण गेल्या वेळी म्हणजे ७ व्या वेतन आयोगाबद्दल बोललो तर राज्य आणि केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात सरासरी २०-२५ टक्के वाढ झाली होती.

### सर्वप्रथम कोणत्या राज्यात पगार वाढला गेला


केंद्रीय कर्मचाऱ्यांवर आठवा वेतन आयोग लागू होताच, केंद्र सरकार राज्यांसाठीही मार्गदर्शक तत्त्वे जारी करेल. अशा परिस्थितीत, राज्य सरकारांवर अवलंबून आहे की ते त्यांच्या राज्यात हा आठवा वेतन कसा लागू करतील. जर आपण मागील वेतन आयोगांच्या अंमलबजावणीकडे पाहिले तर हे स्पष्ट होते की मोठ्या आणि श्रीमंत राज्यांमध्ये या शिफारशी लवकर लागू केल्या जातात.

उदाहरणार्थ, ७ व्या वेतन आयोगाच्या वेळी, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात आणि तामिळनाडू सारख्या राज्यांनी गती दाखवली आणि ती प्रथम लागू केली. त्याच वेळी, जर आपण आठव्या वेतन आयोगाबद्दल बोललो तर उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र सारख्या राज्यांमधील कर्मचाऱ्यांना यामध्येही अधिक फायदे मिळू शकतात, कारण या राज्यांची आर्थिक स्थिती मजबूत आहे. तसेच केंद्रात आणि या राज्यात एकाच पक्षाचे सरकार आहे. जास्तीत जास्त पगारवाढीचा प्रश्न आहे, तर केंद्र सरकारच्या फिटमेंट फॅक्टरनुसार जे राज्य सरकार मूळ पगार वाढवेल, त्या राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात सर्वाधिक वाढ होईल.

# दहा कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करा- दादा भुसे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

पुणे : मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार शिक्षण विभागाकरीता आखण्यात आलेल्या १० कलमी कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी; विभागाच्या अधिकाधिक सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करण्याच्यादृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ येथे शालेय शिक्षण आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या विषयाबाबत आढावा बैठकीत त्यांनी सूचना दिल्या. यावेळी शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावर, शिक्षण संचालक माध्यमिक संपत गोसावी, शिक्षण संचालक प्राथमिक शरद गोसावी, योजना संचालक महेश पालकर, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील आदी उपस्थित होते.



मंत्री भुसे म्हणाले, माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी कृती कार्यक्रम आखून राज्यात कॉपीमुक्त अभियान राबवावे. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घ्यावा, भेटीदरम्यान स्वच्छतागृह, स्वयंपाकगृह, आहार, स्वच्छ पिण्याचे पाणी, बैठक व्यवस्था आदी भौतिक सुविधांसोबत अभ्यासक्रमावरही लक्ष केंद्रीत करावे. शाळेतील भौतिक सुविधांबाबत राज्यस्तरीय आराखडा तयार करावा, याकरीता आवश्यकतेनुसार सुधारणात्मक उपाययोजना कराव्यात. याकामी विविध सामाजिक संस्थांचीही मदत घ्यावी. अधिकाऱ्यांनी एक शाळा दत्तक घेण्याबाबत नियोजन करावे. शाळेच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री प्रत्यक्ष शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत, त्यादृष्टीने नियोजन करावे.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला, क्रीडा अशा गुणांचा विकास झाला पाहिजे, याकरीता विभागनिहाय शाळेबाबत नियोजन करावे. तालुकास्तरावर इतर शाळांना मार्गदर्शक ठरेल अशी एखादी आदर्श शाळा निर्माण करा, त्यामध्ये वाचनालय, अत्याधुनिक प्रयोगशाळा, संगणकीकृत वर्ग, क्रीडांगण, खेळाचे साहित्य आदींचा समावेश करावा. शालेय प्रवेश प्रक्रियेत पालक व विद्यार्थ्यांची गैरसोय होता कामा नये, शाळेत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आहार द्यावा, विद्यार्थ्यांची नियमितपणे आरोग्य तपासणी करावी, आजाराचे निदान होईपर्यंत त्याला मदत करावी, असेही ते म्हणाले.

## जाहिर नोटीस

या नोटिसीद्वारे तमाम नागरिकांना कळविण्यात येते की मुरबाड नगरपंचायत हद्दीतील मधिल मालमत्ता क्रंमाक ३२६ ही मालमत्ता कै.शंकर दगडू घागस यांच्या नावे नगरपंचायत दप्तरी नोंद आहे. परंतु सदर मालमत्ता आता श्री संतोष शंकर घागस यांच्या नावे नगरपंचायत दप्तरी नोंद करावयाचे आहे. तरी सदर मिळकतीस या व्यतिरिक्त अन्य कोणाला हरकत घ्यायची असल्यास त्यांनी आजपासून

म्हणजे नोटिस निघाल्या पासून ७ दिवसांच्या आत मा. नगरपंचायत ,मुरबाड येथे हरकत घ्यावी. त्यानंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.तदनंतर महाराष्ट्र नगर पंचायत/नगरपरिषद औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० अन्वये सदर मिळकत वरिल प्रमाणे माझे नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आपला**
**श्री. संतोष शंकर घागस**

## जाहिर नोटीस

या नोटिसीद्वारे तमाम नागरिकांना कळविण्यात येते की मुरबाड नगरपंचायत हद्दीतील मधिल मालमत्ता क्रंमाक ३२५ ही मालमत्ता कै.शंकर दगडू घागस यांच्या नावे नगरपंचायत दप्तरी नोंद आहे. परंतु सदर मालमत्ता आता श्री.कचरू शंकर घागस व श्री.संजय शंकर घागस यांच्या नावे नगरपंचायत दप्तरी नोंद करावयाचे आहे. तरी सदर मिळकतीस या व्यतिरिक्त अन्य कोणाला हरकत घ्यायची असल्यास त्यांनी आजपासून म्हणजे नोटिस निघाल्या पासून ७ दिवसांच्या आत मा.नगरपंचायत ,मुरबाड येथे हरकत घ्यावी. त्यानंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही.तदनंतर महाराष्ट्र नगर पंचायत/नगरपरिषद औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० अन्वये सदर मिळकत वरिल प्रमाणे माझे नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आपला**
**श्री.कचरू शंकर घागस**
**श्री. संजय शंकर घागस**

# आंबिवली लाईटहाऊस संस्थेच्या वतीने विविध स्पर्धा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

कल्याण : आंबिवली येथील लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन कौशल्य विकास केंद्र आंबिवली वतीने नुकतेच जागतिक युवा दिन, स्वामी विवेकानंद जयंती, मकर संक्रांत साजरी करण्यात आली. या विविध दिनांचे औचित्य साधत विविध स्पर्धाचे आयोजन केले होते. त्यामध्ये सामाजिक विषयावर रांगोळी स्पर्धा, आंबिवली लाईटहाउस केंद्राची माहिती देणारे रील मेकिंग स्पर्धा व बॉलिवूड वेशभूषा स्पर्धा आणि उखाणा स्पर्धा घेऊन विविध आकर्षक असे पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेसाठी कौशल्य विकास केंद्रामधील १२० हुन अधिक युवक-युवतीनी उपस्थिती दर्शवली. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून अदानी फाउंडेशनच्या सीएसआर प्रमुख हेतल परमार, सावित्री स्मृती चैरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या संस्थाप्रमुख प्रियांका आखाडे आणि आंबिवली केंद्राचे प्रमुख सागर खरात उपस्थित होते.

# जीवनदीप महाविद्यालयात वाचन पंधरवडा संपन्न







दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी

गोवेली : गेल्या १ जानेवारीपासून महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या 'वाचन संकल्प महाराष्ट्रचा' या अभियानांतर्गत वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संपूर्ण राज्यभरात विविध उपक्रम राबवले जात होते. जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे देखील या वाचन पंधरवड्याचं आयोजन केलं होतं. तरुण पिढीला मोबाईल आणि सोशल मीडियापासून दूर ठेवून त्यांच्यामध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबवला होता. या वाचन पंधरवड्यामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.त्यात ग्रंथालय संदर्भ साधनांची ओळख, पुस्तव ? प्रदर्शन, लेखक वाचक संवाद, वाचन संकल्प, पुस्तक परीक्षण (ओपन बुक डे) , ग्रंथदिंडी सोहळा यांसारखे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना वाचनासाठी अधिक प्रोत्साहित केले गेले. या कार्यक्रमाच्या मदतीने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याचे, सृजनशीलता आणि विचारक्षमता वाढवण्याचे, मराठी भाषेचा प्रचार करण्याचा , समूह वाचनाची सवय लावण्याचे तसेच सांस्कृतिक जाणीवा वाढवण्याचे उद्दिष्ट साध्य करता आले. यावेळी जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन ल ाभले. संस्थेचे संचालक प्रशांत घोडविंदे प्राचार्य डॉ केबी कोरे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य जयकुमार रिझवानी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश रोहणे, निर्मल इंग्लिश मिडीयम स्कूल च्या मुख्याध्यापिका भावना कुंभार तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित लेखक साहित्यिक व प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीत महाविद्याल याचे ग्रंथपाल प्रा राजाराम कापडी यांच्या संयोजाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. यावेळी सर्व विभागाचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक यांनी या उपक्रमामध्ये उस्फुर्त सहभाग घेतला आणि भरघोस प्रतिसाद दिला.

# शुभांगी भोसले आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

कल्याण : छत्रपती शिक्षण मंडळाच्या नूतन विद्यालय,कल्याण या शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका शुभांगी भोसले गेल्या दोन दशकांपेक्षा अधिक काळ ज्ञानदानासाठी सक्रिय आहेत. त्यांच्या या शिक्षण क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना या वर्षीचा सोशल एज्युकेशन मुव्हमेंट, मुंबई या संस्थेचा मानाचा सावित्रीबाई फुले महिला आदर्श शिक्षिका -2025 पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, ट्रॉफी आणि दहा हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

शिक्षणाचा वसा हाती घेतलेल्या सावित्रीमाईच्या लेकीला त्यांच्या नावाने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. हा मानाचा पुरस्कार प्रा. गजानन डोंगरे चेतना महाविद्यालय, वांद्रे आणि डॉ. मृणालिनी आहेर YCMOU सायन्स इन्स्टिटयूट, सातारा यांच्याहस्ते देण्यात आला. SEM UNIT, मुंबईचे सर्व पदाधिकारी, शाम शिरसाट, धर्मेंद्र रामटेके, शशांक शेडगे यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम साकार झाला. या विशेष पुरस्कारासाठी विद्यार्थी,पालक आणि समाजातील विविध क्षेत्रातून शुभांगी भोसले यांचे कौतुक होत आहे. शुभांगी भोसले या सृजनशील विद्यार्थीप्रिय, कर्तव्यनिष्ठ शिक्षिका असून वक्तृत्व, गायन, भाषा विषयाच्या मार्गदर्शक शिक्षिका असून चार वर्षांपासून साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

आतापर्यंत 75 पेक्षा जास्त विषयावर काव्यलेखन, अभ्यासपूर्ण लेख शिक्षणविवेक, चैत्रपालवी, ओऊळ, रानगंध यांसारख्या मासिकात छापून आले आहेत. जाई जुई नावाचा प्रतिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित आहे.

उत्कृष्ठ सूत्रसंचलनामुळे त्या उपस्थितांची दाद मिळवतात. शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक दिग्गज विद्यार्थी त्यांनी घडवले आहेत. अभिनय, कला, क्रीडा, नौदल, आणि लष्कर सेवेतील त्यांचे माजी विद्यार्थी आजही त्यांच्यासोबत जिव्हाळयाचे संबंध जपत आहेत.

माजी विद्यार्थ्यांनी त्यांना ज्ञानाई पुरस्काराने सन्मानित केले होते. याच बरोबर त्यांना कल्याण नागरिक आदर्श महिला पुरस्कार, महाराष्ट्र भूषण पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, गुणवंत शिक्षक पुरस्कार, सावित्रीच्या लेकी सन्मान यासारखे अनेक पुरस्कार प्राप्त आहेत.

# हरेश्वर पाटील सेवानिवृत्त



दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर प्रतिनिधी

सफाळे / पालघर हद्दीतील सफाळे पोलीस ठाणे, अंतर्गत येणाऱ्या मौजे. नवघर येथील पोलीस पाटील हरेश्वर पाटील यांचा वयोमानानुसार दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी, सफाळे पोलीस ठाणे येथे, अविरहीत २९ वर्षे सेवा प्रदान केल्या बद्दल. सफाळे पो. ठाणे. प्रभारी पोलीस अधिकारी दत्ता शेळके सपोनि, यांच्या हस्ते व सफाळे पोलीस ठाणे हद्दीतील येणारे पोलीस पाटील यांच्या उपस्थितीत. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. हरेश्वर पाटील यांना सन १९९६ साली, मा. प्रांत अधिकारी पालघर, यांच्या कडून नवघर गावाचे पोलीस पाटील म्हणून पदभार - जबाबदारी- देण्यात आलेला. त्यावेळी पासून ते निवृत्त वया पर्यंत, हरेश्वर पाटील यांनी, गावातील कायदा सुव्यवस्था, अबाधित राखण्यासाठी तसेच सार्वजनिक निवडणूका, सार्वजनिक, धार्मिक सण, नैसर्गिक आपत्ती, नियंत्रण आस्थापन आदि कार्यासाठी सतत इमाने इतबारे २९ वर्षे सेवा प्रदान केली. या कार्यकाळात आपल्या पदाचा कार्यभार सांभाळताना, आपल्या मनात कोणा बद्दल कोणतीही द्वेष, राग, आकस, न ठेवता निःपक्षपाती पणे गावकरी यांच्या सोबत आपले कार्य केले. व सर्वांना कायदा आणि सुव्यवस्था यांचे महत्त्व पटवून गावात शांतता ठेवली.

त्यांच्या याच कार्याची पोच म्हणून श्री. दत्ता शेळके सपोनि. यांच्या हस्ते व सफाळे हद्दीतील पोलीस पाटील यांच्या उपस्थितीत त्यांचा, शाल श्रीफळ, व पुष्पगुच्छ देऊन त्यांना गौरवण्यात आले. यावेळी श्री. निलेश म्हात्रे- यांनी प्रेमाची भेट म्हणून हरेश्वर पाटील यांना, ड्रेस पीस व मिठाई देऊन सर्वाचे तोंड गोड केले. तसेच सफाळे पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या पोलीस पाटील यांनी, त्यांना आपल्या प्रेमाचे प्रतिक आठवणी साठी. एक मनगटी घड्याळ व फोटो फ्रेम सर्वानुमते देण्यात आली.

या प्रसंगी श्री दत्ता शेळके सपोनि साहेब यांनी, आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. श्री. हरेश्वर पाटील यांचा पोलीस ठाण्यात सर्वानुमते होणारा सत्कार हिच त्यांच्या ईमाने इतबारे केलेल्या २९ वर्षांच्या कार्याचा पोच आहे. त्यांच्या कार्याबद्दल बोल ण्यासाठी शब्द अपुरे पडतील. यावेळी श्री. सुजीत पाटील, श्री. राजेश पाटील, शरद सातवी निलेश म्हात्रे, कैलास शेळके- पोह. सफाळे पो. ठाणे. यांनी आप आपल्या परीने हरेश्वर पाटील यांच्या बद्दल आपले मनोगत व्यक्त करीत. त्यांना सुखी आयुष्यासाठी पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. केतन पाटील -गिराळे यांनी केले तर, आभार प्रदर्शन कार्य सत्कार मुर्ती श्री हरेश्वर पाटील

# क्रांतिपर्व कादंबरी राज्यभर पोहचवू

## डॉ. प्रा.प्रदीप ढवळ



दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील इतिहासाचे शिलेदार हुतात्मा भाई कोतवाल यांच्या जीवनावर आधारित क्रांतिपर्व या कादंबरीला महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या माध्यमातून राज्यभर पोहचवू अशी ग्वाही साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रा. प्रदिप ढवळ यांनी गोवेली येथे दिली.

स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठान आणि कोकण मराठी साहित्य परिषद कल्याण ग्रामीण शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गोमाजी रामा पाटील स्मृती पुरस्कार वितरण सोहळा आणि गिरीश कंटे लिखित पिपल्स पब्लिकेशन्स द्वारा क्रांतिपर्व या कादंबरीचे प्रकाशन डॉ.ढवळ यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की,समाजातील उपेक्षित राहिलेल्या क्रांतिवीर, हुतात्मे यांना पुस्तक रूपाने जिवंत करण्याचे काम लेखक करीत असतात.त्यांच्या पाठीशी साहित्य आणि संस्कृती मंडळ उभे आहे.त्यांनी ते काम प्रामाणिकपणे करावे असेशी डॉ. ढवळ म्हणाले. यांप्रसंगी इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांनी ग्रंथ भाष्य करताना सांगितले की, भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या कार्याचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे,शासनाने दखल घेऊन त्यांच्या स्मृती जगविण्यासाठी सहकार्य केले तरच खऱ्या अर्थाने या वीरांना आदरांजली ठरेल.

स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठानचे वतीने सालाबाद प्रमाणे यंदाही समाजात निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या बारा व्यक्तींना पुरस्काराने गौरवविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे होते तर व्यासपीठावर अनुसया बाई गोपाळ जामघरे,विठ्ठल हरी डामसे, सुभाष हरड, राजेश लाड, चित्रपट निर्माते दिग्दर्शक इलियास, सुधीर घागस, कल्पेश भोईर, दिपक घीगे, योगेश शेलार, शरद म्हात्रे तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक घीगे यांनी केले तर सूत्रसंचालन राजकुमार कडव यांनी केले

# सलग सुट्ट्यांमुळे म्हसोबा यात्रेला प्रचंड गर्दी !



मुरबाड-प्रतिनिधी (दिलीप पवार)

गेल्या १३ जानेवारी २०२५ ला सुरू झालेली ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठी आणि ऐतिहासिक असलेली म्हसा यात्रेवर मंदीचे सावट दिसून येत होते. मात्र मंदीचे खरे कारण म्हणजे कल्याण -मुरबाड रस्त्याचे कॉंक्रीटकरण आणि धुळीचे उडणारे लोळत हे असल्यामुळे कल्याण, डोंबिवली, भिवंडी, ठाणे ,या भागातुन येणारा हौशी आणि मौजमजा करणारा खरा यात्रेकरु फिरकला नसल्याचे काही यात्रेकरुंनी सांगितले. तर असे असताना देखील शनिवार, रविवारी सुट्टी असल्याने तब्बल चार लाख भाविक भक्तांनी दर्शनासाठी हजेरी लावल्याचे दिसून आले. शनिवारी रविवारी मोठी गर्दी उसळणार असल्याचा अंदाज म्हसोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दशरथ पष्टे यांनी दिला होता तो खरा ठरला आहे.

या प्रसिद्ध यात्रेला २२५ वर्षे अधिक कालखंडाची परंपरा आहे. दरवर्षी म्हसोबाच्या संपुर्ण यात्रेत १२ ते १५ ल ाख म्हसोबा चे दर्शन घेत असल्याची माहिती म्हसोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दशरथ (बाळू)पष्टे यांनी दिली आहे. खरेतर या यात्रेचे वैशिष्ट्य असे आहे की, लहानांपासून वयोवृद्धांपर्यत या

यात्रेचे वेद सर्वांनाच लागतात. पूर्वपार कसारा घाटातून नाशिक घोटी, इगतपुरी, अकोले, राजुरी, या भागातील तर माळशेज घाट, दाऱ्याघाट, नाणेघाट , आहुपे घाट यामधून जुन्नर आळेफाटा, नगर, घोडेगाव, आंबेगाव या भागातील लोक आपले बैल घेऊन व्यवसाय धंदा करण्यासाठी कुटुंबासह १५ ते २० दिवस मुक्कामासाठी येत असतात. लोखंडी हत्यारे बनवणारे लोहार, दगडी जाते, पाटे, बनवणारे शिल्पकार करणारे लोक, मातीची भांडी बनवणारे कुंभार लोक, सुप टोपली बनवणारे बुरुड लोक बांगड्या विकणारे कासार लोक, अशा विविध लोकजीवनाचे संमेलन या यात्रेत पाहावयास मिळते. दगडांची चूल मांडून आभाळाच्या छायेत आपला संसार थाटणारे हे सर्व लोक यात्रेचा अविभाज्य घटक आहेत.

सोलापुरी चादरी, लहान मुलींची खेळणी, ब्लँकेट, सफेद व काळया रंगाच्या घोंगड्या त्याचबरोबर म्हसोबाचा प्रसाद म्हणून खाऊ गल्ल ीत मिळणारी मुरबाडची प्रसिद्ध मिठाई म्हणजे जांभूळ, हातोली, लाल शेव खाजे ,लाह्या, कुरमुरे गोड फुटाणे या वस्तू घेण्यासाठी भाविकांची झुंबर उडते. पूर्वी बैलगाडी सजवलेल्या बैलगाडीतून व पायी चाल त भाविक येत असत त्यामुळे मुक्काम अधिक दिवस असे, यात्रेकरूंचा आता वाहनांनी येणाऱ्यांची संख्या वाढली असल्याने ५ते६तास थांबून भाविक निघून जातात. प्रत्येक जण ग्राहक विक्रेते हौसे गवसे नवसे आपापल्या परीने जत्रेचा आनंद लुटतात.

म्हसा यात्रेतील खाम्बलिंगेश्वर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून वर्षातून एकदा तरी या देवस्थानात डोके टेकावे अशी परंपरागत श्रद्धा आहे. लाखो भाविका मुळे येथे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते त्यामुळे स्थानिकांना रोजगार प्राप्त होतो तरी यात्रेची प्रसिद्धी महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधिक झाल्यास यात्रेची व्याप्ती वाढू शकेल अशी भावना म्हसोबा दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी बोलून दाखवली. यंदा म्हसा यात्रेतील घोंगडी ब्लॅंकेट स्वेटर मफलेर बाजारात बंदीचे सावट दिसून येत आहे अशी माहिती व्यापारी वर्गाने दिली आहे. म्हसोबा यात्रेचा सातवा दिवस असून या यात्रेत सीसीटीव्हीची करडी नजर असली तरी, मुरबाड पोलीस स्टेशनच्या वतीने मुरबाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्या मार्गदर्शनाखाली ५९४ पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी, आरसीपी टीम,होमगार्ड, स्वयंसेवक असा जागता पारा ठेवण्यात आला आहे. आतापर्यंत कुठेही अनुचित प्रकार घडलेला नाही तसेच शनिवार ,रविवार,म्हसा यात्रेत गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला असून यात्रा अजुनही आठ दिवस पुढे चालणार असल्याची माहिती म्हसा ग्रामपंचायतीच्या सरपंच जयाताई प्रविण घागस यांनी दिली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) * सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024